आधुनिक विचारांचे

# वर्तमान

बीड । मंगळवार, २६ ऑक्टोबर २०२१ । वर्ष : ३ | आपले वृत्तपत्र, आपला आवाज | अंक : ५२ । पाने : ४ । मूल्य २ ₹




## लोकगायीका कडूबाई खरात यांना मिळाले हक्काचे घर

औरंगाबाद : प्रसिध्द लोकगायिका कडूबाई खरात यांना दोन महिन्यांपूर्वी दिलेला शब्द काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी सोमवारी पूर्ण केला आहे. कडूबाई खरात यांना हक्काचे घर मिळाले आहे. गृहप्रवेश सोहळ्यादरम्यान कडूबाई खरात यांना अश्रू अनावर झाले. यावेळी माजी मंत्री चंद्रकांत हंडोरे, डॉ.कल्याण काळे व मान्यवरांच्या हस्ते घराची चावी खरात यांना सुपूर्त करण्यात आली.

# धनादेश वटला नाही; न्यायालयाने ठोठावला एकाला ३ महिन्यांचा कारावास

## तुळजाभवानी अर्बनला फसविले, ३४ हजारांचा दंडही सुनावला

▶ प्रतिनिधी

माजलगाव : येथील तुळजाभवानी अर्बन मल्टीस्टेटला दिलेला धनादेश न वटल्या प्रकरणी न्यायालयाने एकाला ३ महिन्यांच्या कारावासाची शिक्षा सुनावली आहे. दरम्यान, तुळजाभवानी अर्बनला फसवल्या प्रकरणी अनिल नामदेव भालेराव यास ३४ हजार ८०० रूपयांचा दंडही सुनावण्यात आला आहे.



तुळजाभवानी अर्बन मल्टीस्टेटच्या थकीत कर्जापोटी दिलेला धनादेश न वटल्यामुळे न्यायालयाने आरोपी अनिल नामदेव भालेराव (रा.माजलगाव) यास दोषी ठरवून ३ महिन्यांचा कारावास व ३४ हजार ८०० रूपये दंडाची शिक्षा सोमवारी सुनावली आहे. तुळजाभवानी अर्बन मल्टिस्टेटने अनिल भालेराव यास कर्ज दिले होते. या कर्जाचे हप्ते थकत गेल्यामुळे भालेराव याने वसुलीपोटी रक्कम २८ हजार ५०० रूपयांचा धनादेश तुळजाभवानी सोसायटीच्या हक्कात दिला होता. परंतु आरोपीच्या खात्यात पुरेशी रक्कम नसल्यामुळे हा धनादेश वटला नाही. त्यामुळे सोसायटीने २ फेब्रुवारी २०१७ रोजी अनिल भालेराव विरुद्ध माजलगाव न्यायालयात फिर्याद दिली होती. फिर्यादीत सोसायटीचा पुरावा ग्राह्य धरून प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी एस.एम.जाधव यांनी तुळजाभवानी अर्बन सोसायटीच्या थकीत कर्जापोटी दिलेला धनादेश न वटल्यामुळे आरोपी अनिल नामदेव भालेराव याचा बचाव फेटाळून भालेराव यास ३ महिन्यांची शिक्षा सुनावली. सोसायटीच्या वतीने वकील म्हणून ॲड.व्ही.व्ही.फपाळ, ॲड.टी.एन.कोल्हे व ॲड.पी.पी.गोंडे यांनी काम पाहिले.

### 'धनादेश फसवणूक प्रकरणी सरकारचे कडक धोरण'

तुळजाभवानी अर्बन समाजातील विविध घटकांच्या विकासास मोलाचे योगदान देत आहे. लोकांच्या अडीअडचणीत तुळजाभवानी अर्बन धावून जाते. मात्र काही ग्राहक वेळेवर कर्जाची हप्ते भरत नाहीत. दिलेले धनादेश न वटल्यास पुढील दिलेला शब्दही पाळत नाहीत.

उलट वसुली कर्मचाऱ्यांना उद्धट प्रसंगी अर्वाच्च भाषा वापरतात. त्यामुळे नाईलाजास्तव बँकांना न्यायालयात दरवाजा खटखटावा लागतो. अलीकडे केंद्र सरकारने धनादेश फसवणूक प्रकरणी कडक धोरण अवलंबिले आहे. ग्राहकांनी बँकांशी जिव्हाळाचे संबंध ठेवून वेळेवर कर्जाचे हप्ते भरावेत, अन्यथा न्यायालयीन शिक्षेला सामोरे जावे लागतील. बँका सुध्दा ग्राहकांशी आपुलकीने वागतात. तीच आपुलकी ग्राहकांनी ठेवावी. असा सल्ला तुळजाभवानी अर्बनचे वसुली अधिकारी स्वप्निल स्वामी यांनी 'वर्तमान'शी बोलताना दिला आहे.


बातमी व जाहिरातीसाठी संपर्क

9423209823

मुख्यालय : 'शिवगड' २३, मुख्य रस्ता, मस्जिद चौक, माजलगाव जि.बीड


## फास्टट्रॅकन्यूज

### 'श्री मंगलनाथ'मध्ये महिला सक्षमीकरण कार्यक्रम

माजलगाव : येथील श्री मंगलनाथ मल्टीस्टेट व आरोही इन्फो लिमिटेड पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने सक्षम प्रकल्प अंतर्गत महिला सक्षमीकरण मेळाव्याचे आज मंगळवार, दि.२६ रोजी ठीक ११ वाजता संस्थेच्या जुना मोंढा येथील श्री मंगलनाथ मल्टीस्टेटच्या मुख्य कार्यालयात आयोजित करण्यात आलेले आहे. या कार्यक्रमासाठी अभिनेते संदीप साकोरे, प्रमुख उपस्थिती म्हणून आरोही इन्फो लि.पुणेचे कैलास सोनटक्के व प्रकाश लोणकर तसेच कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रविंद्र कानडे उपस्थित राहणार आहेत. या मार्गदर्शनाचा लाभ घ्यावा असे, श्री मंगलनाथ मल्टिस्टेट माजलगावच्या वतीने आवाहन करण्यात आले आहे.

### अखिल भारतीय किसान सभेतर्फे संघर्ष दिंडी

बीड : अखिल भारतीय किसान सभेच्या वतीने शेतकऱ्यांची दिवाळी गोड व्हावी, या उद्देशाने दिवाळी सरकारच्या दारात माध्यमातून पीक विमा संघर्ष दिंडी काढली जाणार आहे. येत्या २९ तारखेला सिरसाळा येथून पायी दिंडीला सुरूवात होणार आहे. गतवर्षी २०20 खरीप हंगामातील अतिवृष्टीने नुकसान झालेल्या पिकांचा पिक विमा तात्काळ वाटप करण्यात यावा. या बरोबरच केंद्र सरकारच्या निर्देशाप्रमाणे खरीप हंगाम २०२१च्या अतिवृष्टी बाधित सर्व पिकांचा पीक विमा मंजूर करण्यात यावा, यासह विविध मागण्यासाठी ही दिंडी काढली जाणार असून जिल्हाधिकारी कार्यालयावर महामुक्काम करण्यात येणार आहे. दिवाळीच्या आधी शेतकऱ्यांना मदत द्यावी अशी मागणी यावेळी करण्यात आली आहे.

### माजलगावात कचऱ्यात आढळले मृत अर्भक

माजलगाव : शहरातील बसस्थानकाच्या शौचालयाच्या परिसरात एक मयत अर्भक आढळून आल्याने खळबळ उडाली आहे घटनास्थळी माजलगाव शहर पोलिसांनी धाव घेत अर्भक माजलगाव ग्रामीण रूग्णालयात आणले आहे. दरम्यान, या घटनेमुळे माजलगाव शहरातील रुग्णालयांमधील गैरप्रकार चर्चेचा विषय ठरला आहे.

# 'राष्ट्रवादीला अच्छे दिन'

## पापा मोदीनंतर बदाम पंडित, कुंडलिक खांडे, विजय लगड राष्ट्रवादीच्या वाटेवर?







▶ प्रतिनिधी

बीड : जिल्ह्यात राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये विविध पक्षांच्या नेत्यांची इनकमिंग जोरात सुरू असून हे राष्ट्रवादीसाठी अच्छे दिन असल्याच्या प्रतिक्रिया राजकीय वर्तुळात उमटत आहेत. दरम्यान, काँग्रेसचे माजी जिल्हाध्यक्ष पापा मोदी यांच्या प्रवेशानंतर माजी मंत्री बदामराव पंडित, शिवसेनेचे बीड जिल्हाप्रमुख कुंडलिक खांडे, भाजपाचे नेते विजय लगड राष्ट्रवादीत प्रवेश करतील, अशी शक्यता वर्तविली जात आहे.

बीड जिल्ह्यात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश करणाऱ्या नेते, कार्यकर्त्यांची संख्या वाढत आहे. अखिल भारतीय काँग्रेस पार्टीने बीडचे नवे जिल्हाध्यक्ष म्हणून राजेसाहेब देशमुख यांची निवड केल्यानंतर माजी जिल्हाध्यक्ष पापा मोदी नाराज होते. काँग्रेस पक्षाने ज्येष्ठ नेत्या रजनी पाटील यांना राज्यसभेची खासदारकी दिल्याने पापा मोदी यांच्या नाराजीत अधिकच भर पडली. पापा मोदी यांनी बीड जिल्ह्याचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांच्या नेतृत्वाखाली मुंबईत नुकताच राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला.

पापा मोदी यांच्या प्रवेशानंतर शिवसेनेचे नेते तथा माजी मंत्री बदामराव पंडित, शिवसेनेचे बीड जिल्हाप्रमुख कुंडलिक खांडे हे राष्ट्रवादीत प्रवेश करतील अशी जोरदार चर्चा सुरू झाली. त्यानंतर राष्ट्रवादीच्या खासदार सुप्रिया सुळे यांची मुंबईत पंडित आणि खांडे यांनी भेट घेतल्याचे छायाचित्र व्हायरल झाल्याने या चर्चेला दुजोरा मिळाला आहे. खांडे बऱ्याच दिवसांपासून शिवसेनेवर नाराज असल्याचे बोलले जात आहे. ते लवकरच राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश करतील, अशी जोरदार चर्चा सुरू आहे. भाजपाचे तेलगाव येथील नेते विजय लगड हे भाजपाच्या काही स्थानिक नेतृत्वावर नाराज असल्याचे उघडपणे बोलले जात आहे. दरम्यान, लगड हे आगामी जिल्हा परिषद निवडणूक डोळ्यासमोर ठेवून कोणत्याही प्रसंगी कमळ सोडून राष्ट्रवादीचे घड्याळ हाती धरतील. अशी जोरदार चर्चा सुरू आहे. या चर्चेला भाजपामधून दुजोरा मिळत आहे.

### राष्ट्रवादीची विचारसरणी सर्वसमावेशक : रमेश सोळंके



बीड जिल्ह्यातील अनेक नेते कार्यकर्ते राष्ट्रवादीच्या संपर्कात आहेत. प्रवेश करू इच्छित आहेत. यावर प्रतिक्रिया देताना राष्ट्रवादी काँग्रेसचे माजलगाव तालुकाध्यक्ष रमेश सोळंके म्हणाले, राष्ट्रवादी काँग्रेसचे सर्वेसर्वा शरद पवार यांचे विकासात्मक धोरण तळागाळातील लोकांना पटत आहे. तरूणाईच्या गळ्यातील ताईत म्हणून जिल्ह्याचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांचे नेतृत्व पुढे येत आहे आणि माजलगाव मतदारसंघाचे भाग्यविधाते आमदार प्रकाश सोळंके यांच्या कुशल नेतृत्वामुळे राष्ट्रवादीला उर्जितावस्था मिळत आहे. याचे श्रेय पक्षाच्या कामाला दिले पाहिजे. राष्ट्रवादी काँग्रेसची विचारसरणी सर्वसमावेशक असल्याने तरूण वर्ग पक्षाकडे आकर्षित होत असल्याचे सोळंके म्हणाले.

# शौचालय बांधा अन्यथा; तीव्र आंदोलनाला सामोरे जा

## नगरसेविका सिमा होके यांची तंबी



▶ प्रतिनिधी

माजलगाव : शहरातील प्रभाग क्रमांक ९ मध्ये तात्काळ शौचालय बांधा अन्यथा तीव्र आंदोलनाला सामोरे जा, अशी तंबी काँग्रेसच्या नगरसेविका सिमा नारायण होके यांनी निवेदनाद्वारे मुख्याधिकाऱ्यांना दिली.

प्रभाग ९ मध्ये शौचालय उभारणे अत्यंत गरजेचे आहे. मात्र माजलगाव नगरपालिका या प्रश्नाकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत आहे. शौचालय नसल्याने नागरिकांची गैरसोय होत आहे. विशेषतः महिला वर्गाची कुचंबना होत आहे. या ज्वलंत प्रश्नी नगरपालिका प्रशासन सुस्त झाले आहे. त्यामुळे त्वरित शौचालय उभारा, अन्यथा तीव्र आंदोलनाला सामोरे जा, असा इशारा सिमा नारायण होके यांनी दिला आहे.







# स्वप्न पहा आणि व्हा निवेदक, व्हा अभिनेते!

## अभिनेते संदीप साकोरे यांच्याकडून अभिनयाचे धडे

▶ प्रतिनिधी

पुणे : झी मराठीवरील 'बाजी' मालिकेतील रामा सरदार असो किंवा 'स्वराज्यरक्षक संभाजी' मालिकेतील गायकवाड पाटील असो, या प्रत्येक भूमिकेत संदीप साकोरे यांनी प्रेक्षकांना खिळवून ठेवले. अभिनयाबरोबरच सिनेसृष्टीत लेखक, दिग्दर्शक, सिनेअभिनेते, निवेदक असणारे साकोरे नेहमीच नवनवीन प्रयोग करत असतात. कलेच्या माध्यमातून झी मराठीवर गाजलेल्या बाजी, स्वराज्यरक्षक संभाजी, बाळूमामाच्या नावानं चांगभलं यांसारख्या मालिकांमधून महाराष्ट्रातील घराघरात पोहोचलेले कलाकार साकोरे अनेकांना आर्थिक परिस्थितीत स्वप्न बघण्याची उमेद देत आहे.

स्वप्न पूर्ण करण्यासाठी खेडे किंवा शहर असा भेदभाव नसतो ही संकल्पना मोडीत काढत कलाकार संदीप साकोरे अभिनय आणि निवेदनाच्या क्षेत्राची आवड असणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी 'अभिनय आणि निवेदनाचा' कोर्स सुरू करत आहे. स्वप्न पहा आणि व्हा निवेदक, व्हा अभिनेते!, आम्ही बी घडलो, तुम्ही बी घडा! या माध्यमातून साकोरे यांच्या वतीने ३ महिन्याच्या कोर्सचे मोडूल्स मॉडर्न महाविद्यालयात



१ ऑगस्टपासून सुरू करण्यात आले आहे. ज्याप्रमाणे साकोरे यांनी त्यांच्या शैक्षणिक काळात नाट्यशास्त्राचा कोर्स निवडून वैयक्तिक, व्यावसायिक, सामाजिक आणि आर्थिक आयुष्य घडवले. त्याप्रमाणे गरीब विद्यार्थ्यांना अभिनय आणि निवेदनाच्या कोर्सचा फायदा व्हावा, या हेतूने 'अभिनय आणि निवेदन' या कोर्सची सुरुवात केली आहे.

अभिनय क्षेत्राचा प्रवास सुरू होण्यापूर्वी साकोरे यांनी पुण्यात पदवीचे शिक्षण घेऊन रांजणगाव, औरंगाबाद येथे नोकरी केली. शिवाय, पंधरा वर्ष विद्यार्थ्यांची शिकवणीही घेतली. पण गरिबीतही अभिनयाचं आणि निवेदनाचं स्वप्न स्वस्थ बसू देत नव्हते. साकोरे म्हणतात, काही काळ स्वतःला 'स्ट्रगलर' व्हायला दिला की, आपल्यातले गुण खऱ्या अर्थाने विकसित होऊ लागतात. माझाही नाट्य शास्त्राच्या कोर्सनंतर स्ट्रगलरचा काळ सुरू झाला. या मेहनतीच्या काळात मग्न असताना एके दिवशी साकोरे यांना दिग्दर्शक जितेंद्र वाईकर यांनी 'तुका आकाशा एवढा' या नव्या कोऱ्या चित्रपटात 'संत तुकाराम महाराज' यांच्या भूमिकेसाठी विचारणा केली आणि त्यातूनच सुरू झाला त्यांचा अभिनयाचा प्रवास. साकोरे यांनी या चित्रपटानंतर स्वामी, पेशवाई, विनायक दामोदर सावरकर, कायापालट, छत्रपती शिवाजी आदी ऐतिहासिक पार्श्वभूमी असलेल्या भूमिका साकारल्या. त्यासह ' मी शिवाजीराजे भोसले बोलतोय, मान सन्मान,जिला गाझियाबाद, जॉली एलएलबी'सारख्या हिंदी चित्रपटांच्या माध्यमातून त्यांनी हिंदी चित्रपटसृष्टीतही पदार्पण केले. अभिनयाबरोबरच साकोरे हे 'आवाज आणि आवाजातील पल्ले' याचे अभ्यासक आहेत. त्यांची १९८८ मध्ये पुण्यातील आकाशवाणी येथे निवड झाल्यानंतर त्यांनी शिशु विहार, बालोद्यान, युवा वाणी तसेच अनेक नभोनाट्यातही काम केले. विविध क्षेत्रात निवेदक, अभिनेते, कलारंग पुरस्कार विजेते, विशेष कलागौरव पुरस्कार विजेते त्याचबरोबर आकाशवाणी येथे आपली छाप सोडून खऱ्या आयुष्यात माणूस म्हणून आर्थिक अडचणींवर मात करणारे साकोरे खऱ्या अर्थाने प्रत्येक कलेला आकार देणारे कलाकार आहेत.

### ऑस्कर' आणणे आपले स्वप्न : संदीप साकोरे

सद्यस्थितीत चित्रपट सृष्टीत येणारे अनेक तरूण काही काळानंतर ताणतणावाने त्रस्त होतात. याबाबत साकोरे म्हणतात, नकारात्मक विचारांचा वापर तुमच्या अभिनयासाठी करा आणि नकारात्मकतेवर मात करत 'बाजी'गर व्हा! कारण अभिनयात प्रत्येक स्वप्न पूर्ण करण्याची ताकद आहे. अभिनय क्षेत्रात ऑस्कर' भारतात आणण्याचे स्वप्न साकोरे यांनी यावेळी बोलताना सांगितले.


वर्तमान प्रतिबिंब

रहा ऑनलाईन कनेक्ट..

www.vartmannews.in

या वेबसाईटला भेट द्या !

## संपादकीय

# टेकऑफ पुढील चॅलेंजेस

आज प्रत्येक क्षेत्रात स्पर्धा वाढली आहे. त्यामुळे त्याला विमान वाहतूक क्षेत्रही अपवाद नाही. गेल्या काही वर्षापासून हवाई वाहतूक क्षेत्र अडचणीतून जात आहे. विमान वाहतूक कंपन्यांमध्येही मोबाईल कंपन्यांसारखी अनिष्ट स्पर्धा सुरू झाली. त्यातून वाहतुकीचे दर कमी करण्याची स्पर्धा लागली. परिणामी, हवाई वाहतूक क्षेत्र अडचणीत येत गेलं. त्यामुळे सामान्य लोकांना विमानप्रवास करणं शक्य झालं; परंतु त्याचबरोबर विमान कंपन्यांचा तोटा वाढला. या कंपन्यांनी हजारो कोटी रुपयांचं कर्ज काढलं. त्यामुळे अगोदर किंगफिशर आणि नंतर जेट कंपनी अडचणीत आली. सरकारी मालकीची आणि दर्जेदार सेवा म्हणून जिचा उल्लेख केला जायचा, ती एअर इंडियाही अडचणीत आली. या कंपनीच्या विक्रीचा वारंवार प्रयत्न केला गेला; परंतु त्याला फारसा प्रतिसाद मिळाला नाही. एअर इंडियामध्ये टाटा उद्योगसमूहाची भावनिक गुंतवणूक होती. त्यामुळेच टाटा समूह एअर इंडियाला स्वीकारायला तयार झाला. आता एअर इंडियाची मालकी ६८ वर्षांनंतर पुन्हा टाटा उद्योग समूहाकडे आली असली आणि एअर इंडिया जागतिक दर्जाची कंपनी करण्याचा मानस टाटा समूहाने केला असला, तरी त्यांच्यापुढे मोठी आव्हानं आहेत, याचा विसर पडू नये. ताज्या निर्णयानंतर या कंपनीला सरकारी मानसिकतेतून बाहेर काढून कॉर्पोरेट पद्धतीनं चालवण्याचं शिवधनुष्य आता टाटांना उचलावं लागेल. टाटा समूहासाठी हा क्षण आनंदाचा आहे. एअर इंडिया ही कंपनी पुन्हा या समूहाच्या ताब्यात आली आहे. या कंपनीला एअरलाइन चालवण्याचा खूप अनुभव आहे. एअर इंडिया टाटाकडे परत गेली हे चांगलं झालं. ही विमान सेवा टाटांनीच सुरू केली होती; परंतु नंतर सरकारने तिचं राष्ट्रीयीकरण केलं. ही एक चुकीची चाल होती. कारण त्या वेळी ही विमानसेवा जगातल्या प्रमुख विमान कंपन्यांपैकी एक होती. त्या काळातले राज्यकर्ते सर्व व्यवसाय सरकारने करावा, या मताचे होते. कोटा-परमीट राजने खासगीकरणाच्या वाढीत आणि विकासात अडथळे आणले. आता एअर इंडिया पुन्हा टाटांच्या हातात आली असली, तरी तिला तोट्यातून बाहेर काढणं हे महत्त्वाचं आहे. कारण कोरोनाच्या काळात विमान कंपन्यांच्या प्रवासी संख्येत मोठी घट झाली आहे. अजूनही कोरोनाचं संकट दूर झालेलं नाही. पर्यटन उद्योग अजून सावरलेला नाही. परदेशातली विमान वाहतूक अजूनही सुरळीत झालेली नाही. अशा परिस्थितीत विमान प्रवासाचं भाडंही वाढलं आहे. त्या तुलनेत लोकांचं उत्पन्न मात्र घटलं आहे. त्यामुळे सामान्य नागरिक विमान प्रवासाकडे पाठ फिरवण्याची शक्यता आहे. अर्थात टाटा समूहाला आव्हान पेलणं काही नवं नाही. या प्रकरणातून हे लक्षात येतं की, सरकारी उपक्रम तोट्यात जाण्यापूर्वी त्याचं खासगीकरण करणं केव्हाही चांगलं. एअर इंडियाकडे एकूण १४६ विमानं असून एकूण ताफ्याच्या ५६ टक्के विमानं कंपनीच्या मालकीची आहेत. याशिवाय कंपनीकडे आंतरराष्ट्रीय आणि देशांतर्गत विमानतळांवरच्या मोक्याच्या लँडिंग आणि पार्किंगच्या जागा आहेत; पण अधिक किफायतशीर विमान कंपन्या आल्यानंतर गेल्या दशकभरामध्ये कंपनीचा बाजारपेठेतला दबदबा कमी झाला. एव्हिएशन फ्युएल म्हणजेच विमानांना लागणाऱ्या इंधनाच्या वाढलेल्या किमती, विमानतळ वापराचे वाढलेले दर, लो-कॉस्ट विमान कंपन्यांकडून होणारी स्पर्धा, डॉलरच्या तुलनेत घसरलेलं रुपयाचं मूल्य आणि खराब आर्थिक कामगिरीमुळे वाढलेल्या कर्जावरील व्याजाचा डोलारा या सगळ्यांचा परिणाम एअर इंडियावर झाला. एअर इंडियामध्ये गुंतवणूक करणाऱ्या टाटा समूहाला कंपनीवरचं कर्जही काही प्रमाणात स्वीकारावं लागेल. जवळपास ७० विमानांसाठी त्यांना पुढची ८ ते १० वर्ष परतफेड करावी लागणार आहे. याशिवाय एअर इंडियाच्या १४ हजारांपेक्षा जास्त लोकांचा ताफा सांभाळणंही आव्हानात्मक असल्याचं तज्ज्ञांचं म्हणणं आहे. एअर इंडियाकडे ३१ मार्च २०२० पर्यंत ४५ हजार ८६३ कोटी २७ लाख रुपयांची मालमत्ता आहे. यामध्ये एअर इंडियाची जमीन, इमारती, विमानांचा ताफा आणि इंजिनांचा समावेश आहे. २०१९-२०च्या उपलब्ध आकडेवारीनुसार, एअर इंडियावर एकूण ३८ हजार ३६६ कोटी ३९ लाख रुपयांचं कर्ज आहे. एअर इंडिया असेट्स होल्डिंग लिमिटेडच्या स्पेशल पर्पज व्हेइकलला (एसपीव्ही) एअरलाइन्सकडून २२ हजार ६४ कोटी रुपये हस्तांतरित केल्यानंतर ही रक्कम राहते. एअर इंडियाचं अधिग्रहण केल्यानंतर टाटा समूहाकडे एअर एशिया इंडिया, विस्तारा, एअर इंडिया आणि एअर इंडिया एक्सप्रेस या चार विमान कंपन्या असतील. या कंपन्या १५० देशांतर्गत मार्गावर उड्डाणं चालवतात. यापैकी जास्तीत जास्त १२१ उड्डाणं एअर इंडियाची आहेत. त्यानंतर एअर एशिया इंडिया ४६, विस्तारा ४२ आणि एअर इंडिया एक्सप्रेस १३ उड्डाणं हाताळते. एअर इंडिया एक्सप्रेस मुख्यतः आंतरराष्ट्रीय उड्डाणं चालवते. त्याची आंतरराष्ट्रीय उड्डाणं कोणत्याही आंतरराष्ट्रीय उड्डाणापूर्वी ठेवली जातात. याचा अर्थ एअर इंडिया एक्स्प्रेसचं घरगुती नेटवर्क एअर इंडियापेक्षा काहीसं वेगळं आहे आणि दोन विमान कंपन्यांमध्ये कोणतीही स्पर्धा नाही. टाटा समूहाच्या दोन विद्यमान विमान कंपन्यादेखील आपापसात रहदारीचं नुकसान करत नाहीत. यापैकी एक सिंगापूर एअरलाइन्सच्या भागीदारीत पूर्ण-सेवा प्रीमियम विमान कंपनी आहे, तर दुसरी मलेशियाच्या एअर आशियाच्या कमी किमतीच्या मॉडेलवर चालते. विस्ताराची उड्डाणं असलेले सहा सेक्टर वगळता सर्व क्षेत्रांमध्ये एअर इंडियाची उपस्थिती आहे. यामुळे वेळापत्रकाचं नियोजन हा गंभीर प्रश्न आहे. या विमान कंपन्यांची नियमित अंतरानं एकाच सेक्टरवर उड्डाणं होऊ शकतात.

# कोरोना लसीकरणात महाविक्रम

**भारताने २१ ऑक्टोबर २०२१ रोजी लसींच्या १०० कोटी मात्रा देण्याचा टप्पा, लसीकरण सुरु झाल्यानंतर केवळ नऊ महिन्यात गाठला. कोविड-१९ ला तोंड देत असताना आणि ते देखील २०२० च्या सुरुवातीच्या काळात ज्या प्रकारची परिस्थिती निर्माण झाली होती तिचा विचार करता, हा असामान्य प्रवास म्हणावा लागेल. तब्बल १०० वर्षांनी इतक्या भयंकर महामारीला समस्त मानवजमात तोंड देत होती आणि कोणालाही या विषाणूची फारशी माहिती नव्हती. आपल्याला चांगलेच आठवत असेल की त्यावेळी आपल्या सर्वांना एका अज्ञात आणि झपाट्याने पसरत जाणाऱ्या एका अदृश्य शत्रूला तोंड द्यावे लागत असल्याने पुढे काय करायचे आणि पुढे काय होणार तेच लक्षात येणार नाही अशी पूर्णपणे संभ्रमात टाकणारी परिस्थिती निर्माण झाली होती.**

विशेष

**नरेंद्र मोदी**



अगतिकतेकडून आश्वासकतेकडे झालेला हा प्रवास आहे आणि या दरम्यान आपला देश अधिक सामर्थ्यवान बनला आहे, जगातील सर्वात मोठ्या लसीकरण मोहिमेचा हा परिणाम आहे. समाजातील अनेक घटकांना सामावून घेणारा हा खऱ्या अर्थाने भगीरथ प्रयत्न म्हणता येईल. याचे मोजमाप करायचे झाले तर प्रत्येक लसीकरणासाठी एका आरोग्य कर्मचाऱ्याला केवळ दोन मिनिटे लागली. या वेगाने सुमारे ४१ लाख मानव दिवस किंवा अंदाजे ११ हजार मानव वर्षांचे प्रयत्न या टप्प्यापर्यंत पोहोचण्यासाठी खर्च झाले आहेत. अशा प्रकारे गती आणि व्याप्ती प्राप्त करण्यासाठी आणि ती कायम राखण्यासाठी सर्व संबंधितांमध्ये विश्वासाचे वातावरण निर्माण करणे अतिशय महत्त्वाचे असते. या मोहिमेच्या यशस्वितेचे एक कारण म्हणजे लसीबाबत विविध प्रकारे गैरसमज निर्माण करण्याचे आणि गोंधळ माजवण्याचे प्रयत्न होऊन देखील, लोकांमध्ये या लसीविषयी निर्माण झालेला विश्वास आणि राबवण्यात आलेली लसीकरणाची प्रक्रिया हे आहे. आपल्यामध्ये काही लोक असे आहेत ज्यांचा केवळ परदेशी ब्रँडवरच विश्वास असतो आणि अगदी आपल्या दैनंदिन वापराच्या वस्तूंसाठी देखील त्यांना तेच ब्रँड हवे असतात. मात्र, ज्यावेळी कोविड-१९ लसीसारख्या अतिशय महत्त्वाच्या गोष्टीच्या वापराची वेळ आली त्यावेळी भारताच्या जनतेने एकमताने भारतात उत्पादित' झालेल्या लसींवरच एकमताने विश्वास दाखवला. हा एक मोठा परिवर्तनकारक परिणाम म्हणावा लागेल. लोकसहभागाच्या उर्जेसह भारताचे नागरिक आणि सरकार समान ध्येयासाठी एकत्र आले तर देश काय मिळवू शकतो याचे भारताची कोविड प्रतिबंधक लसीकरण मोहीम हे उत्तम उदाहरण आहे. भारताने जेव्हा कोविड प्रतिबंधक लसीकरण कार्यक्रम सुरु केला तेव्हा १३० कोटी भारतीयांच्या क्षमतेबद्दल शंका व्यक्त करणारे अनेक लोक होते. त्यापैकी काही म्हणाले की भारताला यासाठी ३ ते ४ वर्ष लागतील. इतर काहीजण म्हणाले की, सामान्य लोक लसीकरणासाठी पुढे येणारच नाहीत. काहीजण असे देखील म्हणत होते की लसीकरणाच्या प्रक्रियेत भयंकर अव्यवस्थापन आणि गोंधळ होईल. इतर काही असे सुद्धा म्हणाले की भारताला पुरवठा साखळीचे योग्य प्रकारे व्यवस्थापन करणे जमणार नाही. मात्र, जनता कर्फ्यू आणि त्यानंतर लागलेल्या टाळेबंदीच्या वेळेस दिलेल्या अभूतपूर्व प्रतिसादाप्रमाणेच, सामान्यांना विश्वसनीय सहकारी म्हणून सोबत घेऊन काम केले तर कसे नेत्रदीपक यश मिळू शकते हे भारताच्या जनतेने दाखवून दिले. जेव्हा प्रत्येकजण जबाबदारी स्वीकारतो तेव्हा काहीही मिळवणे अशक्य नसते. आपल्या आरोग्य सुविधा कर्मचाऱ्यांनी लोकांना लस देण्यासाठी अडचणीच्या भौगोलिक परिस्थितीत डोंगरावरून मार्गक्रमण केले, नद्या ओलांडल्या . अगदी विकसित देशांशी तुलना करता असे लक्षात येते की लसीकरणाच्या बाबतीत भारतात अत्यंत कमी प्रमाणात संभ्रमावस्था होती ही सत्य परिस्थिती आहे आणि याचे श्रेय आपले युवक, सामाजिक कार्यकर्ते, आरोग्य विभागाचे कर्मचारी, सामाजिक तसेच धार्मिक नेते या सर्वांना जाते. लसीकरणाच्या प्रक्रियेत प्राधान्यक्रमाची वागणूक मिळण्यासाठी लवकर लस घेण्यात रुची असणाऱ्या अनेक गटांकडून खूप दबाव आणला गेला. मात्र आपल्या इतर सर्व योजनांप्रमाणेच लसीकरण मोहिमेत देखील कोणतीही व्हीआयपी संस्कृती शिरकाव करणार नाही हे सरकारने सुनिश्चित केले होते. २०२० सालच्या सुरुवातीला, जेव्हा कोविड-१९ संसर्गाने जगभर पाय रोवायला सुरुवात केली तेव्हाच या महामारीचा मुकाबला केवळ लसीच्या मदतीनेच केला जाऊ शकतो हे आपल्याला स्पष्ट दिसत होते. आपण विविध तज्ञ गटांची स्थापना केली आणि एप्रिल २०२० पासून पुढील काळासाठीचा मार्ग आखण्यास सुरुवात केली. भारताने १०० कोटी मात्रांचा टप्पा पार केला असताना, आजवर हाताच्या बोटावर मोजता येतील इतक्याच देशांनी स्वतःची लस विकसित केली आहे. १८० पेक्षा देश अतिशय मर्यादित उत्पादकांवर अवलंबून आहेत आणि अनेक देश त्यांच्या लस पुरवठ्याची वाट बघत आहेत! भारताकडे आपली स्वतःची लस नसती तर काय झाले असते याचा थोडा विचार करा. इतक्या मोठ्या लोकसंख्येसाठी लस कुठून मिळाली असती आणि त्यासाठी किती वर्षे लागली असती? याचं सगळं श्रेय भारतीय वैज्ञानिकांना आणि उद्योजकांना द्यावे लागेल, जे गरज असताना देशाच्या मदतीला धावून आले. त्यांचे कौशल्य आणि त्यांची मेहनत यामुळेच आज भारत लसीच्या बाबतीत आत्मनिर्भर आहे. इतक्या मोठ्या लोकसंख्येसाठी लसींची मागणी पूर्ण करण्यासाठी त्या प्रमाणात उत्पादन वाढवून आपल्या लस उत्पादकांनी दाखवून दिले की ते कुणापेक्षाही काकणभरही डावे नाहीत. ज्या देशात सरकार म्हणजे प्रगतीतला अडथळा समजले जात होते, तिथे आता आमचे सरकार प्रगतीचा मार्ग प्रशस्त करून त्याला चालना देणारे आहे. सरकारने पहिल्या दिवसापासून लस उत्पादकांच्या हातात हात घालून काम सुरू केले आणि त्यांना संस्थात्मक सहाय्य, वैज्ञानिक संशोधन, अर्थपुरवठा तसेच वेगवान नियंत्रण प्रक्रिया याद्वारे मदत केली. संपूर्ण सरकार' या दृष्टिकोनातून सरकारची सर्व मंत्रालये एकत्र आली आणि लस उत्पादकांच्या मदतीला धावून त्यांचे सर्व अडथळे दूर केले. भारतासारख्या विशाल देशात केवळ उत्पादन करणं पुरेसं नाही तर, देशातल्या शेवटच्या घटकापर्यंत त्याची अंमलबजावणी होणे आणि त्यासाठी अतिशय निर्वेध अशी वाहतूक व्यवस्था आणि त्याचे व्यवस्थापन असणे आवश्यक आहे.अशी व्यवस्था उभारण्यातली आव्हाने समजून घेतली तर आपल्याला कल्पना करता येईल की लसीच्या प्रत्येक कुपीचा झालेला हा प्रवास किती खडतर होता. पुणे किंवा हैदराबाद इथल्या लस निर्मिती प्रकल्पापासून ते देशातील सर्व राज्यातील मुख्य केंद्रात ही लस पाठवली जाते. त्यानंतर तिथून ती जिल्ह्यातील मुख्य केंद्रात पाठवली जाते आणि तिथून ती विविध लसीकरण केंद्रांवर पोहोचवली जाते. अशा कितीतरी हजारो खेपा करत, विमाने आणि रेल्वेगाड्यानी या लसी देशाच्या कानाकोपऱ्यात पोहचवल्या आहेत. या संपूर्ण प्रवासादरम्यान, तापमान एका विशिष्ट अंशांवर राखावे लागते ज्यावर मध्यवर्ती देखरेख ठेवली जाते. यासाठी १ लाखांहून अधिक शीतगृहे साखळी उपकरणे वापरण्यात आली. राज्यांना लसींच्या वितरणाच्या वेळापत्रकाची आगाऊ सूचना देण्यात आली होती जेणेकरून ते त्यांच्या लसीकरण मोहिमेचे उत्तम प्रकारे नियोजन करू शकतील आणि निर्धारित तारखांपूर्वी लसी त्यांच्यापर्यंत पोहोचतील. स्वतंत्र भारताच्या इतिहासातील हा एक अभूतपूर्व प्रयत्न आहे. या सर्व प्रयत्नांना कोविन मंच या मजबूत तंत्रज्ञान प्लॅटफॉर्मची मदत झाली. त्यांनी हे सुनिश्चित केले की लसीकरण मोहीम न्याय्य, मोजदाद करण्याजोगी, आढावा घेण्याजोगी आणि पारदर्शक असेल. यामुळे पक्षपात करायला किंवा रांग मोडायला वाव राहिला नाही. हे देखील सुनिश्चित केले गेले की गरीब मजुरांना त्याच्या गावात लसीची पहिली मात्रा घेता येईल आणि त्याच लसीची दुसरी मात्रा ज्या शहरात तो काम करतो, तिथे योग्य कालावधीनंतर घेता येईल. पारदर्शकता वाढवण्यासाठी रिअल-टाइम डॅशबोर्ड व्यतिरिक्त, क्यूआर-कोडे असलेल्या प्रमाणपत्रांद्वारे पडताळणी करण्यात आली. केवळ भारतातच नव्हे तर जगातही अशा प्रयत्नांची उदाहरणे क्वचितच आढळतील. २०१५ मध्ये माझ्या स्वातंत्र्य दिनाच्या भाषणात मी म्हटले होते की, आपला देश टीम इंडिया' मुळे पुढे वाटचाल करत आहे आणि ही' टीम इंडिया आपल्या १३० कोटी लोकांची मोठी टीम आहे. लोकसहभाग ही लोकशाहीची सर्वात मोठी ताकद आहे. जर आपण १३० कोटी भारतीयांच्या सहभागातून देश चालवला तर आपला देश प्रत्येक क्षणी १३० कोटी पावले पुढे जाईल. आपल्या लसीकरण मोहिमेने पुन्हा एकदा या टीम इंडिया'ची ताकद दाखवून दिली आहे. लसीकरण मोहिमेत भारताने मिळवलेल्या यशाने संपूर्ण जगाला लोकशाहीत हे शक्य आहे हे देखील दाखवून दिले आहे. मी आशावादी आहे की जगातील सर्वात मोठ्या लसीकरण मोहिमेत मिळवलेले यश आपल्या युवकांना, नाविन्यपूर्ण संशोधन करणाऱ्यांना आणि सरकारच्या सर्व स्तरांना सार्वजनिक सेवा वितरणाचे नवीन मापदंड निश्चित करण्यासाठी प्रोत्साहित करेल आणि हा केवळ आपल्या देशासाठीच नव्हे तर जगासाठी देखील एक आदर्श असेल.

(लेखक भारत देशाचे पंतप्रधान आहेत)

# विदेशातील ब्लॅकमनीचे पुढे काय ?

**नामवंत भारतीयांची परदेशात गुप्त गुंतवणूक असल्याचा सनसनाटी गौप्यस्फोट पँडोरा पेपर्स'मधे करण्यात आला आहे. बेकायदेशीर मार्गाने पैसे कमावणं, मालमत्ता दडवणं, छुप्या मार्गाने निधी देशाबाहेर गुंतवणं, अशा तर्हेचे उद्योग अनेक व्यापारी-उद्योगपती आणि सेलिब्रिटी करत असतात. देशातल्या बँका आणि अर्थसंस्थांचा पैसा बुडवायचा आणि स्वतःचे खिसे भरायचे, असे हे उद्योग संतापजनक आहेत.**

अर्थविश्व

**हेमंत देसाई**




सुमारे ६४ वर्षापूर्वी, प्यासा' या सिनेमासाठी ये दुनिया अगर मिल भी जाए तो क्या है' हे गीत साहिर लुधियानवीने लिहिलं होतं. जगातल्या प्रत्येक गोष्टीवर स्वामित्व मिळवून त्याचा उपयोग काय? असा तत्त्वचिंतनात्मक सवाल साहिरने उपस्थित केला होता. उलट तीन वर्षापूर्वीच्या बाजार' या सिनेमात महत्त्वाकांक्षी रिझवान हा विधिनिषेधशून्य भांडवलदार शकुन कोठारीच्या जगात प्रवेश करतो. त्या दोघांची चकमक होण्यापूर्वी ते पार्टी करतात. यो यो हनी सिंगने गायलेल्या बिलियनेर' या गाण्याचे शब्द असे आहेत - इटली का खाएंगे दोनों हम पिझ्झा, डिप्लोमेटिक पासपोर्ट मेरा चाहिए नो विसा. दुबई में शिवास, कॅलिफोर्निया में ग्रास...' या संपूर्ण गाण्यात पैसा मिळवणं, साठेबाजी करणं आणि तो बेभानपणे खर्च करणं, असं बेबंद भांडवलशाहीचं तत्त्वज्ञान मांडण्यात आलंय. काळ खरोखरच किती बदलला आहे. या पार्श्वभूमीवर, नामवंत भारतीयांची परदेशात गुप्त गुंतवणूक असल्याचा सनसनाटी गौप्यस्फोट पँडोरा पेपर्स'मधे करण्यात आला आहे.

परदेशी कंपन्यांमधे मोठी गुंतवणूक

२०१६ला अवसायनात गेलेल्या ब्रिटिश व्हर्जिन आयलँडमधल्या एका परदेशी कंपनीचे लाभार्थी मालक म्हणून सचिन तेंडुलकर आणि त्याच्या कुटुंबीयांची नावं पँडोरा'त आली आहेत. या कंपनीच्या अवसायनाच्या वेळी तिचे समभाग तेंडुलकर कुटुंबीयांनी खरेदी केले होते. ९० समभागांची किंमत ६० कोटी रुपये इतकी असावी, असा अंदाज केला जाऊ शकतो. ही सर्व गुंतवणूक वैध मार्गाने केली असल्याचा खुलासा सचिनच्या वकिलांनी केला आहे. उद्योगपती अनिल अंबानी यांनी आपली मालमत्ता शून्य असल्याचं गेल्यावर्षी एका ब्रिटिश न्यायालयात सांगितलं होतं. प्रत्यक्षात त्यावेळी त्यांनी सहकाऱ्यांच्या मदतीने बीवीआय आणि सायप्रस इथल्या १८ कंपन्यांमधे कोट्यवधी रुपयांची गुंतवणूक केली होती. २००७ ते २०१० या काळात स्थापण्यात आलेल्या कंपन्यांपैकी सात कंपन्यांनी १.३ अब्ज पौंडांचं कर्ज घेऊन या रकमेची गुंतवणूक केली आहे. अलीकडेच निधन झालेले काँग्रेस नेते सतीश शर्मा यांच्याही परदेशात कंपन्या आणि मालमत्ता होत्या, असं स्पष्ट झालं असून, निवडणुकीचा अर्ज भरताना शर्मा यांनी ही माहिती जाहीर केली नव्हती.

पँडोरा म्हणजे काय?

टू ओपन द पँडोराज बॉक्स' या म्हणीचं मूळ ग्रीक पुराणकथेत आहे. पँडोरा या जगातल्या पहिल्या स्त्रीने पेटी उघडली आणि त्यातून शारीरिक आणि मानसिक दुःखं बाहेर पडली, असा त्या कथेचा संदर्भ आहे. अनेक गुंतागुंतीच्या समस्यांना जन्म देणारी प्रक्रिया म्हणजे पँडोरा' असं संबोधन त्यातून तयार झालं. पँडोरा पेपर्स'मधे बायोकॉन लिमिटेडच्या कार्यकारी अध्यक्ष किरण शॉ मुजुमदार यांच्या पतीचंही नाव असून, आपल्या पतीची परदेशातील संस्था कायदेशीर असल्याचा खुलासा त्यांनी केला आहे. या यादीत नीरव मोदी, नीरा राडिया यांच्यासह ३८० भारतीयांची नावं आहेत. हे प्रकरण जागतिकस्तरावरचं असल्यामुळे, पाकिस्तानचे काही मंत्री आणि पंतप्रधान इम्रान खान यांच्या काही निकटवर्तीयांची नावंही त्यात आहेत. इंटरनॅशनल कन्सॉर्सियम ऑफ इन्वेस्टिगेटिव जर्नलिस्ट' या संस्थेसाठी जगभरातील नामांकित पत्रकारांनी ही सर्व माहिती जमा केली असून, त्यामुळे शोधपत्रकारिता अद्यापही जिवंत आहे हे यावरून स्पष्ट होतं.

काळ्या पैशाचे सात अहवाल

भारत सरकारने पँडोरा'प्रकरणी केंद्रीय प्रत्यक्ष कर मंडळाच्या माध्यमातून तपासाची घोषणा केली असून, सक्तवसुली संचालनालय, रिझर्व बँक आणि आर्थिक गुप्तचर विभाग यांचंही त्यात सहकार्य असणार आहे. मोदी सरकारने काळ्या पैशाच्या संदर्भात सर्वोच्च न्यायालयाच्या दोन न्यायाधीशांच्या नेतृत्वाखाली जे विशेष चौकशी पथक स्थापन केलं होतं, त्या पथकानेही या प्रकरणात कारवाई केली जावी, असं मत व्यक्त केलं आहे. केंद्र सरकारच्या विशेष चौकशी पथकाचे अध्यक्ष न्यायमूर्ती एम. बी. शहा असून, त्यांनी म्हटलंय की, आतापर्यंत काळ्या पैशाबाबत आपण सात अहवाल सरकारला सादर केले आहेत. देशात याप्रकरणी सध्या जे सुरू आहे, ते विविध यंत्रणांच्या संबंधित तज्ज्ञांना माहिती नसावं ही आश्चर्याची गोष्ट असल्याचं त्यांनी म्हटलंय. त्यांचं हे निरीक्षण गंभीर आहे. या स्थितीत कितीही माहिती गोळा झाली, तरी त्यावर कारवाई होणार का? हाच खरा कळीचा प्रश्न आहे.

बेकायदेशीर मार्गाने पैसै कमावणं, मालमत्ता दडवणं, छुप्या मार्गाने करचुकवेगिरीसाठी निधी देशाबाहेर गुंतवणं, अशा तर्हेचे उद्योग व्यापारी-उद्योगपती आणि सेलिब्रिटी करतच असतात. ज्या देशात करांचे दर जास्त आहेत, त्या देशांमधल्या धनिक-वणिक स्वित्झर्लंड, बर्म्युडा, पनामा, लक्झेंबर्ग, बीवीआय यासारख्या टॅक्स हेवन असलेल्या देशांत पैसे गुंतवतात. शेल कंपन्या किंवा ट्रस्टमार्फत हे पैसे परदेशात पाठवून, स्वदेशात करमुक्ती मिळवली जाते. देशातल्या बँका आणि अर्थसंस्थांचा पैसा बुडवायचा आणि स्वतःचे खिसे भरायचे, असे हे संतापजनक उद्योग आहेत. स्टेट बँकेसह अनेक बँकांना टोप्या घालून नीरव मोदी, मेहुल चोक्सी, विजय मल्ल्या हे विदेशात अक्षरशः मजा मारत आहेत. यापूर्वीही ऑफशोअर लिक्स, पॅराडाईझ पेपर्स, पनामा पेपर्स या माध्यमातून धनदांडग्यांची बदमाशी उघडकीस आली होती. त्यानंतरही लबाडीचे हे प्रकार अजिबात थांबले नाहीत. त्यामुळे पँडोरा बॉक्स उघडल्याबरोबर, परदेशातील काळा पैसा भारतात येऊन लगेच सुखभरे दिन येतील, असं नाही.

# भाजपला ओबीसी आरक्षण संपवायचे काय?

## कृतज्ञता मेळाव्यात मंत्री छगन भुजबळ यांचा सवाल

प्रतिनिधी

बीड : ओबीसींचे राजकीय आरक्षण धोक्यात आल्यावर आम्ही अध्यादेश काढण्याची भूमिका घेतली. राज्यपालांनी स्वाक्षरी केली नाही, त्यासाठी मी देवेंद्र फडणवीस यांना घरी जाऊन भेटलो. त्यानंतर अध्यादेशावर स्वाक्षरी झाली. मात्र, आता ओबीसींच्या राजकीय आरक्षणाला भाजपच्याच धुळे येथील पदाधिकाऱ्याने उच्च न्यायालयात आव्हान दिले आहे. भाजपला आरक्षण संपवायचे आहे का, देवेंद्र फडणवीस त्यांना आवरणार आहेत का, असा प्रश्न उपस्थित करुन अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनी टीकास्त्र सोडले.

ओबीसींच्या राजकीय आरक्षणाला अध्यादेशातून संरक्षण दिल्याबद्दल मंत्री छगन भुजबळ यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेस व महात्मा फुले समता परिषदेतर्फे आयोजित कृतज्ञता मेळावा शनिवारी येथील यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात पार पडला. यावेळी पालकमंत्री धनंजय मुंडे, आमदार संदीप क्षीरसागर, आमदार संजय दौंड, माजी आमदार अमरसिंह पंडित, उषा दराडे, पृथ्वीराज साठे, समता परिषदेचे कार्याध्यक्ष बापुसाहेब भुजबळ, महिला प्रदेशाध्यक्ष मंजिरी घाडगे, राष्ट्रवादी काँग्रेस ओबीसी सेलचे प्रदेशाध्यक्ष ईश्वर बाळबुधे, प्रा.पी.टी.चव्हाण, इंजि.विष्णू देवकते, समता परिषदेचे जिल्हाध्यक्ष ॲड.सुभाष राऊत आदी उपस्थित होते. मंत्री छगन भुजबळ पुढे बोलताना म्हणाले, ओबीसी संख्येने अधिक आहेत, पण जागरूक नाहीत, स्वत:च्या अधिकारांची, हक्काची जाणीव नाही. मंडल आयोग राज्यात लागू व्हावा, यासाठी मी ३० वर्षापूर्वी शिवसेनेत असताना बोलत होतो. शरद पवार तेव्हा मुख्यमंत्री होते, त्यांनी मंडल आयोग लागू



केला आणि ओबीसींना आरक्षण मिळाले. ओबीसी जनगणनेसाठी समता परिषदेने न्यायालयात लढा दिला. दिवंगत गोपीनाथ मुंडे, समीर भुजबळ यांच्यासह शंभर खासदारांनी मागणी लावून धरल्याने केंद्र सरकारने ओबीसींची आर्थिक व सामाजिक जनगणना केली. केंद्राकडे ही सर्व माहिती आहे, पण त्यात त्रुटी असल्याचा दावा करुन ती उघड केली जात नाही. पाच वर्षात त्रुटी दुरुस्त का केल्या नाहीत, असा प्रश्न भुजबळ यांनी केला. ओबीसी आरक्षणासाठी कोणालाही हात जोडायला तयार आहे, असे त्यांनी सांगितले. भाजपच्या ओबीसी जनजागरण मोहिमेवर टीका करताना भुजबळ म्हणाले, जनजागराची खरी गरज दिल्लीत आहे. भाजपने तेथे जनजागरण करून ओबीसी जनगणनेबाबत जाब विचारावा. यावेळी पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी ओबीसींचे राजकीय आरक्षण रद्द झाल्यावर भाजपकडून झालेल्या टीकेचा व राजीनाम्याच्या मागणीचा समाचार घेतला. ते म्हणाले, भाजप सत्तेत होता तेव्हाच आरक्षणाची न्यायालयीन प्रक्रिया सुरू झाली. राष्ट्रवादीने कायमच ओबीसी नेतृत्वाला संधी दिली आहे. त्यामुळे भाजपला राष्ट्रवादीवर टीका करण्याचा अधिकार नाही. समता परिषदेचे जिल्हाध्यक्ष ॲड.सुभाष राऊत यांनी प्रास्ताविक केले. तसेच यावेळी इतर मान्यवरांचीही भाषणे झाली.



## 'छत्रपती'कडून सभासदांना साखर वाटप सुरू : मोहन जगताप

प्रतिनिधी

माजलगाव : तालुक्यातील छत्रपती सहकारी



साखर कारखान्याची दीपावली सणानिमित्त सर्व सभासदांना सवलतीच्या दरात दि.२३ ऑक्टोबर ते दि.३० ऑक्टोबर या कालावधीत साखर वाटप सुरू आहे. तरी सर्व सभासदांनी आपले आधारकार्ड ओळखपत्र दाखवून आपली साखर आपल्या भागातील शेतकी विभागीय कार्यालय सावरगाव, मालीपारगाव, माजलगाव, छोटेवाडी, निपाणी टाकळी, पात्रुड, तेलगाव या विभागावरून घेऊन जावी असे आवाहन कारखान्याचे उपाध्यक्ष मोहनराव जगताप यांनी केले आहे. तसेच दीपावलीच्या सर्व सभासदांना शुभेच्छा दिल्या आहेत.

# केंद्राच्या निषेधार्थ माजलगावात निघाली गॅस तिरडी यात्रा

प्रतिनिधी

माजलगाव : केंद्र सरकारच्या गॅस दरवाढीच्या निषेधार्थ माजलगावात राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या वतीने गॅस तिरडी यात्रा काढली. यावेळी पदाधिकाऱ्यांनी जोरदार घोषणाबाजी केली.

देशातील भाजपा प्रणित केंद्र सरकारच्या चुकीच्या मनमानी धोरणामुळे पेट्रोल, डिझेल, गॅस सारख्या जिवनावश्यक इंधन दरवाढीचे भाव गगनाला भिडले आहेत. कोविडमुळे अगोदरच भारतीय नागरिक आर्थिक संकटात होरपाळून निघालेला आहे. त्यामध्ये भर म्हणून केंद्र सरकारने पेट्रोल, डिझेल, गॅस इंधन दरवाढ केली आहे. सदर दरवाढ सर्वसामान्य नागरीकांना परवडणारी नसून आवाक्या बाहेर आहे. उपरोक्त दरवाढीची बात केंद्रस्थानी ठेवून राष्ट्रवादी युवक काँग्रेस, महाराष्ट्र राज्य यांनी केंद्र सरकारच्या विरोधात दि.२० ऑक्टोबर रोजी महाराष्ट्रभर आंदोलन



आयोजित केले आहे. यावेळी माजलगाव राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या वतीने गॅस तिरडी यात्रा काढून केंद्र सरकारचा निषेध करण्यात आला. यावेळी उपस्थित राष्ट्रवादीचे विधानसभा अध्यक्ष विश्वंभर थावरे, राष्ट्रवादी काँग्रेस तालुकाध्यक्ष रमेश सोळंके, ॲड.प्रमोद तौर, राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे तालुकाध्यक्ष नितीन जाधव, क्षितिज गायकवाड, सुशांत पौळ, शेख असिफ, सय्यद लतिफ, विष्णुपंत नाईकनवरे, राजू कुरेशी, अण्णा पास्टे, शुभम भोसले, अनवर पटेल, फिरोज पठाण, मोसिन बागबान, शुभम मगर, नेहाल खान, ज्ञानेश्वर आबुज, प्रशांत तौर, शेख वसिम, सचिन झगडे, अल्ताफ मिर्झा, भागवत कांबळे, किरण ढगे, बाळासाहेब डाके, अविनाश डाके, छगन मेंडके, ज्ञानेश्वर आबूज, जीवन घोडके, पांडुरंग डाके, नवनाथ चव्हाण, गणेश डाके, चंद्रकांत पवार, अशोक राऊत, गोबिंद धुमाळ, रोहित नायबळ, विलास नायबळ, महेश तपसे आदींसह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

# नव्या मोंढ्यात १५ हजार क्विंटल सोयाबीनची आवक

प्रतिनिधी

माजलगाव : या हंगामातील सोयाबीन खरेदीस सात दिवसांपूर्वी सुरूवात झाली असून, येथील नव्या मोंढ्यात आवक वाढल्याने अवघ्या चार-पाच दिवसांत तब्बल १५ हजार क्विंटल सोयाबीनची आवक झाली आहे.

यंदा पाऊस जास्त झाल्याने कापूस, सोयाबीन या पिकांचे प्रचंड नुकसान झाले असून जवळपास ५० टक्के या पिकांच्या उत्पादनात नुकसानीची भर पडली आहे. एक तर मागील काही वर्षात कापूस उत्पादनाचे क्षेत्र घटत असून शेतकऱ्यांचा कल सोयाबीन पिकाकडे जास्त प्रमाणात आहे. परंतु, अतिवृष्टीमुळे तब्बल १५ दिवस या पिकांमध्ये पाणी साचल्याने पिके हातची गेली आहेत. शेतकऱ्यांनी



शेतात पाणी उतरल्यानंतर आपली पिके काढणीस सुरूवात केली. त्यानंतर आता येथील नवा मोंढ्यात १८ ऑक्टोबरपासून सोयाबीनची आवक सुरू झाली आहे, अवघ्या चार,पाच दिवसांत १५ हजार क्विंटल सोयाबीनची आवक झाली असून चांगल्या प्रतीच्या मालाला पाच हजार रूपये प्रतिक्विंटल तर पावसामुळे नुकसान होऊन काळपट पडलेल्या मालाला ४१०० रूपये दर देण्यात येत आहे. सध्या मोंढ्यात सर्वत्र सोयाबीनच्या मालाची आवक झाली आहे. यापुढे सोयाबीनचा दर वाढून सात हजारांपर्यत जाण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. गतवर्षी सोयाबीनला २९०० रूपये ते ३७०० रुपये दर प्रतिक्विंटल मिळाला होता तर वर्षभरात एकूण ३८ हजार ५२५ क्विंटल सोयाबीनची खरेदी झाली होती.

# डॉ.सौदागर यांना बंधूशोक; हाजी अब्दुल सौदागर यांचे निधन



प्रतिनिधी

माजलगाव : येथील नेत्रचिकित्सक डॉ.मुजिब सौदागर यांचे लहान बंधु हाजी अब्दुल मुखिद सौदागर (वय ५२) यांचे हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. एका वर्षात डॉ.सौदागर यांच्या दोन मोठ्या व एक लहान भावाचे निधन झाल्याने दुःखाचा डोंगर निर्माण झाला.

हाजी अब्दुल सौदागर हे आपल्या परळी तालुक्यातील पोहनेर येथे शेतीसह वाळू ठेकेदाराचा व्यवसाय करत होते. सर्वाशी सामंजस्याने वागणारे मनमिळावू व्यक्तीमत्व होते. दोन दिवसापुर्वी त्यांना हृदयाचा तिव्र झटका आल्याने त्यांचे निधन झाले आहे. माजलगाव येथील सौदागर कॉम्लेक्सचे मालक नेत्रचिकित्सक डॉ.मुजीब सौदागर यांचे लहान बंधू होते. त्यांच्या निधनाने पोहनेर माजलगाव परिसरात हाळहाळ व्यक होत आहे. त्यांच्या पश्चात दोन भाऊ डॉ.मुजिब सौदागर, बाखी सौदागर पत्नी, दोन मुले व पाच मुली असा परिवार आहे. या वर्षी त्यांच्या दोन मोठ्या भावाचे ही निधन झाले असून सौदागर परावारावर हाजी अब्दुल मुखिद सौदागर यांच्या तिसऱ्या भावाच्या मृत्युने दुःखाचा डोंगर निर्माण झाला आहे.

## आनंदनगरीत बच्चेकंपनीची धम्माल



माजलगाव : शहरात श्री सिध्देश्वर जिनिंग परिसरात सुरू असलेल्या आनंदनगरीत बच्चेकंपनी धम्माल करत असून रहाटपाळणा आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरत आहे. (छायाचित्र : भगीरथ तोडकरी)

# श्री सिद्धेश्वर महाविद्यालयात वक्तृत्व स्पर्धा

प्रतिनिधी

माजलगाव : येथील भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेच्या श्री सिद्धेश्वर महाविद्यालय माजलगाव येथे स्वर्गीय दत्तोपंत ठेंगडी यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

याप्रसंगी व्यासपीठावर कार्यक्रमाचे उद्घाटक प्राचार्य डॉ.महेश देशमुख, मार्गदर्शक प्रा.डॉ.गजानन होन्ना, तर व्यासपीठावर संयोजक प्रा.डॉ.कमलकिशोर लड्डा, उपप्राचार्य प्रा.युवराज मुळये, प्रा.डॉ.रमेश गटकळ, प्रा.संतोष लिंबकर, प्रा.लक्ष्मीकांत सोन्नर हे उपस्थित होते. याप्रसंगी बोलताना प्राचार्य डॉ.महेश देशमुख यांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अशा स्पर्धेचा खूप फायदा होतो अशा स्पर्धेमध्ये विद्यार्थ्यांनी बक्षीसासाठी



नव्हे तर स्वतःच्या व्यक्तिमत्व विकासासाठी सहभाग नोंदवावा असे सांगितले. तर मार्गदर्शक प्रा.डॉ.गजानन होन्ना यांनी श्रद्धेय दत्तोपंत ठेंगडी यांचे जीवन व कार्य आणि त्यांनी केलेल्या कार्याचा विस्तार सांगून अशा व्यक्तिमत्त्वाचा आदर करून आपण आपले व्यक्तिमत्व कळवावे घडवावे असे आवाहन केले. संयोजक प्रा.डॉ.कमलकिशोर लड्डा यांनी स्पर्धेची भूमिका विशद केली. या स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून प्रा.युवराज मुळये व प्रा लक्ष्मीकांत सोन्नर यांनी परीक्षण केले. या स्पर्धेमध्ये महाविद्यालयातील बारा विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. या स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक कु.अन्वी विकास जाधव, द्वितीय क्रमांक कु.पायल हनुमानदास गिल्डा तर तृतीय क्रमांक कु.मोहिनी चंद्रशेखर पायघन या विद्यार्थ्यांनी प्राप्त केला. या यशस्वी विद्यार्थ्यांचे या कार्यक्रमातच गुणगौरव करण्यात आला. याप्रसंगी महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी संयोजन समितीचे प्रा.डॉ.विकास बोरगावकर प्रा.बाळासाहेब परळकर हे उपस्थित होते. या स्पर्धेचे सूत्रसंचालन प्रा.राजाराम जाधव व आभार प्रदर्शन प्रा.डॉ.रमेश गटकळ यांनी केले.

# माजलगाव नगरपालिकेत सन्मानाने झळकले मंत्री बाळासाहेब थोरात यांचे छायाचित्र

प्रतिनिधी

माजलगाव : येथील नगरपालिका कार्यालयात नगराध्यक्ष शेख मंजूर यांनी मग्रुरी करत काँग्रेसचे नेते तथा महसूल मंत्री बाळासाहेब थोरात यांचे छायाचित्र कार्यालयात लावण्यास मज्जाव केल्यानंतर काँग्रेसचे नेते आक्रमक झाले आणि नगरपालिका कार्यालयात सन्मानाने मंत्री बाळासाहेब थोरात यांचे छायाचित्र झळकवले.

महाराष्ट्रात महाविकास आघाडी सरकार असून कॉमन मिनिमम प्रोग्राम नुसार हे सरकार राज्यात यशस्वी काम करत आहे. परंतु माजलगाव नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक झाल्यावर येथे महाविकास आघाडीच्या ताब्यात येथील नगरपरिषद असून या नगरपरिषदच्या नवीन वास्तूचे लोकार्पण होऊन बरेच दिवस उलटूनही काँग्रेसचे माजी तालुकाध्यक्ष नारायण होके यांनी महाविकास आघाडी नियमा प्रमाणे काँग्रेस नेते तथा महसूल मंत्री



बाळासाहेब थोरात यांचा फोटो लावण्यासाठी वारंवार पाठपुरावा करून ही नगराध्यक्ष आणि नगरपरिषद प्रशासन यांनी कार्यालयात फोटो न लावल्याने चक्क काँग्रेस माजी तालुकाध्यक्ष नारायण होके यांच्या नेतृत्वात काँग्रेसच्या वतीने महसूल मंत्री बाळासाहेब थोरात यांचा फोटो नगरपरिषद कार्यालयात लावण्यात आला. जर महसूल मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या फोटोचा अवमान नगरपरिषद प्रशासन किंवा नगराध्यक्ष यांच्याकडून झाला तर काँग्रेस त्यांना योग्य धडा शिकवल्याशिवाय राहणार नाही, असे आवाहन काँग्रेस माजी तालुकाध्यक्ष नारायण होके पाटील व काँग्रेस अनु.जाती विभागाचे जिल्हाध्यक्ष दत्ता कांबळे यांच्यासह ॲड.एम.एच.इनामदार, अफरोज तांबोळी, शेख अहमद, युवराज ढगे, शेख रशिद सह काँग्रेस कार्यकर्ते यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे.

## 'श्री सिध्देश्वर'कडून वंचितांना संस्काराचे धडे

प्रतिनिधी

माजलगाव : येथील श्री सिध्देश्वर माध्यमिक विद्यालयाने शहराजवळील गेवराई रोड भागातील पालावर वस्ती करून राहणाऱ्या भटक्या विमुक्त जमातीतील शिक्षणा पासून वंचित घटकातील मुलांसाठी संस्कार वर्गाचे आयोजन करण्यात आले.

श्रध्देय दत्तोपंत ठेंगडी यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त हा उपक्रम घेण्यात येत आहे. या कार्यक्रमाची सुरुवात श्रध्देय दत्तोपंत ठेंगडी यांच्या प्रतिमा पूजनाने व श्रीफळ वाढवून झाली. यावेळी श्री सिध्देश्वर शैक्षणिक संकुलाचे कार्यवाह अमरनाथ खुर्पे, शाळेचे मुख्याध्यापक बाबुराव आडे गुरुजी, उपमुख्याध्यापक विजयेंद्र चौधरी सर, पर्यवेक्षक रवींद्र खोडवे सर इत्यादी उपस्थित होते. यापूर्वी येथील मुलांना शालेय शैक्षणिक साहित्य देण्यात आले आहे. या संस्कार वर्गाच्या माध्यमातून उजळणी पाठांतर, वर्णमाला, अक्षर ओळख तसेच सांघिक खेळ, पद्य, बोधकथा, बौद्धिक, स्वच्छतेच्या सवयी इत्यादी गोष्टी घेण्यात येणार आहेत. या संस्कार वर्गामुळे मुलांना आपल्या संस्कृतीची, परंपरांची ओळख तसेच अभ्यासातही गोडी निर्माण होत असे मुख्याध्यापक आडे म्हणाले.

यावेळी विद्यालयातील शिक्षक कमलाकर झोडगे, पंडित मेंडके, परमेश्वर आदमाने, नवनाथ सांगुळे, मुकेश काळे, शिवशंकर भंडारे तसेच वस्तीतील ५० मुले-मुली व पालक उपस्थित होते.

# गुरूकृपा इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसीच्या विद्यार्थ्यांची गरूडझेप







प्रतिनिधी

माजलगाव : डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद संलग्नित गुरूकृपा इन्स्टिटयूट ऑफ फार्मसी माजलगाव येथील प्रथम बॅच निकाल नुकताच जाहीर झाला असून या निकालामध्ये महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले आहे.

येथील गुरूकृपा इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी कॉलेजच्या जगदीश संतोष बनकर याने प्रथम क्रमांक तर पवन नंदकिशोर करवा याने द्वितीय क्रमांक व तौसिफ अल्ताफ मोमीन याने तृतीय क्रमांक मिळवला मिळवित घवघवीत यश संपादन केले.

दरम्यान, या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार महाविद्यालयाच्या वतीने संचालक डॉ.यशवंत राजेभोसले, प्राचार्य डॉ.नरेंद्र चंद्रा तसेच उपप्राचार्य अमित बिंदू व प्राध्यापकांनी केला आणि उर्वरित सर्व उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचे कौतुक करत त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

# ॲडजस्टमेंट करणाऱ्यांची आता गय नाही

## काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांचा टोला

▶ प्रतिनिधी

अंबाजोगाई : केंद्रातले सरकार शेतकरीविरोधी आहे. देशाला आज काँग्रेसची गरज असून काँग्रेसच देश वाचवू शकते. नव्या जोमाने काँग्रेस काम करत आहे. बीड जिल्ह्यात काँग्रेस संपली असे म्हणणाऱ्यांना चपराक देणारा आजचा अंबाजोगाईमधील कार्यक्रम आहे. मागच्या काळात जे झाले ते विसरून जा, जिल्ह्यात काँग्रेस आता ग्रामपंचायत ते विधानसभा सर्व निवडणुका स्वबळावर लढणार आहे. लागेल ती ताकद पक्ष देईल, असे सांगतानाच यापुढे जिल्ह्यात ॲडजस्टमेंट राजकारण करणाऱ्या काँग्रेस कार्यकर्त्यांची गय नाही, असा इशाराही काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी दिला.

अंबाजोगाई येथे काँग्रेसच्या वतीने राज्यसभेवर नियुक्त झाल्याबद्दल खासदार रजनी पाटील यांचा नागरी सत्कार करण्यात आला. या वेळी आयोजित कार्यकर्ता मेळाव्यात काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केंद्र सरकारच्या धोरणांवर कडाडून टीका करतानाच काँग्रेसवर टीका करणाऱ्यांनाही चोख प्रत्युत्तर दिले. मेळाव्यास खासदार रजनी पाटील, माजी मंत्री अशोक पाटील, युवक काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस आदित्य पाटील, माजी आमदार सिराज देशमुख, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राजेसाहेब देशमुख, बाबुराव



मुंडे, हनुमंत मोरे, किरण पाटील यांच्यासह काँग्रेसचे पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी बोलताना पटोले म्हणाले, केंद्रातले भाजप सरकार सर्वसामान्य माणसांचे खिसे कापत आहे. तुमचा पैसा मोठ्यांकडे वळवण्याचे पाप यांनी केले. अंबानी, अदानींची संपत्ती चौपट केली. जिल्ह्यात ओबीसींचे राजकारण मोठ्या प्रमाणात सुरू आहे. दिल्लीत विचारधारा नसलेले सरकार बसलेले आहे. काही लोकांनी मी पुन्हा येईन असं म्हणत स्वप्न दाखवलं, असा चिमटा फडणवीसांना काढला. केंद्राने इम्पिरिकल डाटा न दिल्याने ओबीसींचे नुकसान झाले, सर्वात आधी ओबीसींसाठी आम्ही विधानसभेत ठराव आणला खुर्चीवर बसले की काही नेते समाजाला विसरतात, परंतु आम्ही तसे केले नाही. काँग्रेस हा देशाचा पक्ष आहे आणि हाच पक्ष न्याय देऊ शकतो, असेही नाना पटोले म्हणाले. या वेळी अनेकांनी काँग्रेस पक्षात प्रवेश केला. सूत्रसंचालन राहुल सोनवणे व ज्योती शिंदे यांनी केले.



# 'शाळेच्या सुरक्षेसाठी आपत्ती व्यवस्थापन अनिवार्य'

▶ प्रतिनिधी

माजलगाव : शाळेमध्ये कोणत्याही प्रकारची जीवीत हानी व इतर प्रकारची हानी होवू नये, शाळेच्या सुरक्षिततेसाठी आपत्ती व्यवस्थापन आराखड्याची गरज असल्याचे राजकुमार राठोड यांनी सांगितले. एन.सी.आर. एम.पी. शिक्षण क्षेत्रातील आपत्तीची जोखीम कमी करण्याच्या मुख्य प्रवाहात आणणे या विषयावरील शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांचे तीन दिवसीय राज्यस्तरीय प्रशिक्षण कार्यक्रम यशदा मार्फत मराठवाडा प्रशासकीय व विकास प्रबोधिनी पैठण, औरंगाबाद येथे आयोजित केले होते. प्रशिक्षण कार्यक्रमात ते बोलत होते.

शाळेमध्ये निसर्गनिर्मित किंवा मानवनिर्मित एखाद्या घटनेमुळे धोके निर्माण होतात, यामुळे आपत्तीप्रवण क्षेत्र निर्माण होऊन असुरक्षितता निर्माण होते, या ठिकाणी संकट घडण्याची क्षमता असल्याने तिथे जोखीम तयार होते. आपत्तीचे परिणाम कमी करण्यासाठी जोखीम कमी करण्याचे उपाय करुन उपशमन करायला हवे. यासाठी आपत्तीपूर्व तयारी, सज्ञता, क्षमता वाढवणे, जनजागृती, समाजाभिमुख उपाययोजना करून होणारी आपत्ती कमी करता येऊ शकते किंवा टाळू शकतो. शाळेत सुरक्षित शिकण्याचे वातावरण तयार व्हावे, संभाव्य धोके टाळता यावेत, धोक्यामुळे कोणाची जीवित हानी होऊ नये, वित्त हानी व पर्यावरणीय हानी टाळता यावी इ. यासाठी राज्यातील सर्व शाळेने आपत्ती व्यवस्थापन आराखडा तयार करण्याची गरज असल्याचे सांगत कोविड १९ व शाळा सुरक्षा या विषयी व्याख्यान दिले. या प्रशिक्षण कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी आपत्ती व्यवस्थापन केंद्रचे संचालक कर्नल व्ही.एन. सुपनेकर यांचे मार्गदर्शन लाभले. संचालक संदीप काळे, सूर्यवंशी, सहाय्यक अजय वडांगळे व सहाय्यक ओंकार पोखरकर यांचे सहकार्य मिळाले.

# सुंदरराव सोळंके महाविद्यालयात शेअर मार्केटवर व्याख्यान

▶ प्रतिनिधी

माजलगाव : येथील सुंदरराव सोळंके महाविद्यालयाच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त कौशल्याभिमुख कार्यक्रमा अंतर्गत शेअर मार्केट भविष्यातील गुंतवणूक व संधी या विषयावर दिनांक २६ ऑक्टोबर रोजी व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे.

सुंदरराव सोळंके महाविद्यालय सुवर्ण महोत्सवी वर्ष साजरे करत आहे. याअनुषंगाने महाविद्यालयात कौशल्यभिमुख कार्यक्रमांतर्गत शेअर मार्केट भविष्यातील गुंतवणूक व संधी या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आमदार प्रकाश सोळंके हे राहणार आहेत तर प्रमुख वक्ते म्हणून



श्रीनिवास सोळंके, डॉ.दीपक कोडगीरकर, समीर रुद्रवार हे मार्गदर्शन करणार आहेत. प्रमुख पाहुणे म्हणून गंमतलाल भंडारी, सुरेश भानप, गंगाधर आगे हे उपस्थित राहणार आहेत. तर यावेळी राधाकृष्ण होके पाटील, ॲड.भानुदास डक, सत्यप्रकाश रूद्रवार, डॉ.बळीराम चव्हाण, डॉ.शरद पवार, प्रतापराव रांजवण, प्रा.निळकंठ साबळे, सुरेंद्र रेदासनी, बालासाहेब शिंदे, अण्णाभाऊ वगरे, डॉ.सुनिल गरड, डॉ.शिवाजी मुंडे, शिवाजीराव सुतार, विनायक कदम यांची प्रमुख राहणार उपस्थिती आहे. कार्यक्रमास उपस्थित रहावे, असे आवाहन प्राचार्य डॉ.जी.के. सानप, उपप्राचार्य डॉ.नंदकिशोर मुळे, डॉ.एम.ए.कव्हळे, प्रा.प्रकाश गवते, प्रा.पवनकुमार शिंदे, प्रा.गणेश सोळंके, प्रबंधक प्रशांत चव्हाण, डॉ.भाऊसाहेब राठोड, डॉ.नितीन ढवळे, डॉ.सचिन रूद्रवार यांनी केले आहे.

## तालुकाध्यक्षपदी संदीपान महाराज गोळेकर




माजलगाव :तुळजाभवानी अर्बन मल्टीस्टेटचे संस्थापक अध्यक्ष चंद्रकांत शेजुळ यांनी ह.भ.प.संदीपान महाराज गोळेकर यांची वारकरी साहित्य परिषदेच्या माजलगाव तालुकाध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल तुळजाभवानी मातेचे छायाचित्र देवून सत्कार करण्यात आला. याप्रसंगी राष्ट्रवादीचे नेते जयदत्त नरवडे.

# सुंदरराव सोळंके कारखान्याकडून सभासदांना सवलतीत साखर वाटप

▶ प्रतिनिधी

माजलगाव : लोकनेते सुंदरराव सोळंके सहकारी साखर कारखान्याच्या वतीने याहीवर्षी दिपावली सणानिमित्त कारखान्याचे सभासद यांना प्रती शेअर्स१० किलो साखर सवलतीचे दराने वाटप करण्यातयेणार असल्याची माहिती कारखान्याचे चेअरमन धैर्यशील सोळंके यांनी दिली. याहीवर्षी कारखान्याचे मार्गदर्शक आमदार



प्रकाश सोळंके यांच्या सुचनेप्रमाणे दिपावली २०२१ सणानिमित्त कारखान्याचे सर्व सभासद यांना प्रती शेअर्स १० किलो प्रती किलो रूपये २५ प्रमाणे दि.३० ऑक्टोबर पर्यंत शेती खाते कार्यक्षेत्रातील२३ कार्यालयात सकाळी १०.०० ते सायं.५.०० या वेळेत साखरेचे वाटप करण्यात येणार आहे. तरी कारखाना कार्यक्षेत्रातील सर्व सभासद, डिपॉझीटर्स यांनी वरील कालावधीत आपले नजिकचे शेती कार्यालयाशी संपर्क साधून साखर घेवून जावी, असे आवाहन कारखान्याचे वतीने चेअरमन धैर्यशील सोळंके यांनी करून दिपावली सणानिमित्त सर्व सभासद, ऊस उत्पादक शेतकरी, ऊसतोडणी वाहतूक ठेकेदार, मजूर यांना हार्दिक शुभेच्छा दिल्या.

## 'पँथर'शी संवाद



बीड : येथे पँथर संवाद मेळाव्यात ऑल इंडिया पँथर सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष दीपक केदार यांचे स्वागत करताना उद्योजक सोमनाथ चांदमारे व कार्यकर्ते.

# बीडमधून 'राइज ऑफ वॉर'चे लाँचिंग

## १३ वर्षीय आर्यन कुटेची ग्लोबल झेप; ओएओचा तिसरा गेम सज्ज



▶ प्रतिनिधी

बीड : अभ्यासावर परिणाम होऊ नये म्हणून बालपणी आई-वडील गेम खेळू देत नव्हते. पण गेमची आवड असल्याने अवघ्या दहाव्या वर्षी बीडच्या तिरूमला उद्योग समुहाचे प्रमुख सुरेश कुटे व अर्चना कुटे यांचा मुलगा आर्यनने गेम तयार करण्याची संकल्पना मांडली अन् पालकांच्याच मदतीने अडीच वर्षापूर्वी ओएओ इंडिया ही आयटी कंपनी स्थापन केली. कंपनीच्या माध्यमातून सुरूवातीला कृष्णा माखन मस्ती व त्यानंतर इंडियन फूड बाश हे दोन गेम लाँच केले. दसऱ्याच्या शुभमुहूर्तावर आता 'राइज ऑफ वॉर' हा तिसरा गेम तयार करत जगभरात याचे लॉचिंग बीड येथील कार्यक्रमातून करण्यात आले.

१३ वर्षीय आर्यन सध्या सातवीत शिकतो. त्याला आधीपासून गेममध्ये रूची होती. आई-वडील त्याला यासाठी विरोध करत. पण दहा वर्षाचा असताना शाळा संपली की तो घरी थांबण्यापेक्षा आईबरोबर तिरूमला कंपनीत जात असे, आई सतत कंपनीच्या मीटिंगमध्ये व्यग्र असायची. कंपनीतील अधिकारी-कर्मचाऱ्यांचे आई ज्या पद्धतीने प्रतिनिधित्व करते ते पाहून स्वतःची एक कंपनी असावी असे आर्यनला वाटायचे. त्यामुळे गेम तयार करण्याची संकल्पना त्याने पालकांसमोर मांडली व हे स्वप्न सत्यात उतरवण्यासाठी त्याने आई-वडिलांच्या मदतीने पुणे येथे आएओ इंडिया ही आयटी कंपनी स्थापन केली. या माध्यमातून त्याने सुरुवातीला 'कृष्णा माखन मस्ती' आणि इंडियन फूड बाश हे दोन गेम लाँच केले. याला जगभरातून उदंड प्रतिसाद मिळाला. या यशानंतर त्याने आता 'राइज ऑफ वॉर' हा तिसरा गेम तयार केला. हा गेम सुरुवातीला थायलंडमध्ये लाँच केला. परंतु भारतात याचे लाँचिंग झाले नव्हते. शुक्रवारी बीडमध्ये हा त्याचा तिसरा गेम जगभरात लाँच झाला.




### खेळातील कथानकात गूढ : आर्यन कुटे

ताणतणाव घालवण्यासाठी या गेमच्या माध्यमातून काहीवेळ करमणूक होऊ शकते का? आपला ताणतणाव घालवू शकतो का? असा विचार माझ्या मनात आला आणि त्या भूमिकेतून आम्ही आबालवृद्ध खेळू शकतील असे गेम तयार केले. तिसऱ्या गेममधील स्टोरीमध्ये सस्पेन्स आहे, असे ओएओ इंडिया कंपनीचे मॅनजिंग डायरेक्टर आर्यन सुरेश कुटे यांनी सांगितले.

### एक वर्षाचे परिश्रम : अर्चना कुटे

कुटे ग्रुपचे संस्थापक व आधारस्तंभ दिवंगत ज्ञानोबाराव कुटे यांनी दाखवलेल्या मार्गानेच आमची वाटचाल सुरू आहे. मुलाची गेम तयार करण्याची संकल्पना सत्यात उतरवण्यासाठी कंपनी स्थापन केली. हा गेम तयार करण्यासाठी त्यांच्या टीमला एक वर्ष लागले. आर्यनला आजी राधाकाकू यांच्यासह कुटे ग्रुप परिवाराचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले, कुटे गुपच्या मॅनेजिंग डायरेक्टर अर्चना कुटे यांनी सांगितले.










आधुनिक विचारांचे वर्तमान
हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक आणि **संपादक : भगीरथ गौरीशंकर तोडकरी,** यांनी तुळजा भवानी पब्लिकेशन ,माजलगाव ता.माजलगाव जि. बीड 431131 (महाराष्ट्र) येथे छापून आधुनिक विचारांचे वर्तमान कार्यालय, 23,मुख्य रस्ता, मस्जिद चौक, माजलगाव ता.माजलगाव जि.बीड येथे प्रसिद्ध केले. ईमेल : vartmaneditor@gmail.com भ्रमणध्वनी : **9423209823** RNI : MAHMAR/2018/76928, अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, लेख, व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (सर्व वाद माजलगाव न्यायालय अंतर्गत) Postal REG No : L/92/RNP/Beed/2020-2022.